# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०३ मार्च २०१६

## मुंबई विद्यापीठात पहिल्यांदाच ऑनलाईन ई - एमबीए अभ्यासक्रम

मुंबई – मुंबई विद्यापीठात पहिल्यांदाच ऑनलाईन ई-एमबीए ( ऑनलाईन एक्झेक्युटीव्ह मास्टर ऑफ बिझनेस एडमिनिस्ट्रेशन ) हा अभ्यासक्रम सुरु केला जाणार आहे.आज मुंबई विद्यापीठ आणि फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ ओराल,रशिया यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेमार्फत हा अभ्यासक्रम राबविला जाणार असून या शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रम सुरु केला जाणार आहे. विशेषतः ऑनलाईन पध्दतीने हा अभ्यासक्रम राबविला जाणार असून यासाठी एकुण १०४ क्रेडिट्स विभागून ठेवले जाणार आहेत.

या सामंजस्य करारान्वये राबविण्यात येणारा हा पहिलाच असा अभ्यासक्रम असेल ज्यामध्ये इतर देशातील विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे क्रेडिट स्विकारण्याची मुभा या अभ्यासक्रमात दिली जाणार आहे. हा अभ्यासक्रम संपूर्णतः चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीमवर आधारीत असून दोन वर्षीय या अभ्यासक्रमामध्ये एक वर्ष हा डिप्लोमा म्हणजेच पदविका या स्वरुपात असेल तर पूर्णवेळ अभ्यासक्रम केल्यास दोन वर्षीय एमबीए ही पदवी दिली जाणार आहे.कोणत्याही शाखेतील पदवीधर या अभ्यासक्रमासाठी पात्र असेल. नोकरदार व्यक्तींना किंवा विद्यार्थ्यांना त्यांचे काम सांभाळून ऑनलाईन पध्दतीने व्यवस्थापन अभ्यासक्रम करण्याची संधी यानिमित्ताने विद्यापीठामार्फत उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव ( जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )